नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १७/०८/२०२६ (सोमवार )**

## खुनाच्या गुन्हयातील आरोपीला मा. न्यायालयाने सुनावली सदोष मनुष्यवधाची शिक्षा

**पोलीस स्टेशन देवलापार** :— पोलीस स्टेशन देवलापार येथे अप. क्र. ३१५/२०२३ कलम ३०२, ३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, यातील फिर्यादी नामे सौ. कविता संजय इवनाते, वय ४० वर्ष, रा. पिंडकापार यांचा लहान भाऊ मृतक नरेश जयसिंग वरठी हा असुन फिर्यादीचा पती **आरोपी क्र. १) संजय श्रीराम इनवाते, वय ४० वर्ष, रा. पिंडकापार आणि फिर्यादी आणि मृतकाचा मोठा भाऊ आरोपी क्र. २) नामे महेश जयसिंग वरठी, वय २७ वर्ष, रा. पिंडकापार** हे आहेत. फिर्यादी ही घरी हजर असताना यातील मृतक नामे नरेश जयसिंग वरठी, वय ३० वर्ष, रा. रा. पिंडकापार याचेसोबत असलेल्या वादामुळे त्यामुळे आरोपी क्र. १ याने लोखंडी खुरपी (विळा) ने आणि आरोपी क्र. २) यानी लाकडी काठीने मृतकाचे डोक्यावर मारून जिवानीशी ठार केले.

**तपासी अधिकारी श्री शरद गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. दिनांक १७/०८/२०२६ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायधीश क्रं १६, श्री मोहतेसिम बदर यांनी नमुद दोन्ही आरोपी यांना कलम ३०४(२),३४ भादवि मध्ये ५ वर्ष सश्रम कारावास व ५,०००/— रूपये दंड , दंड न भरल्यास ६ महिने साधा कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.**

सरकारचे वतीने ए.पी.पी. श्रीमती क्रांती शेख यांनी काम पाहीले. सदर खटल्याच्या सुनावली दरम्यान श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक उपविभाग,

पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी, दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण, सहा. पोलीस निरीक्षक श्री. नारायण तुरकुंडे प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन देवलापार, सपोनि श्री विशांत नांदगाये, पोलीस अंमलदार श्रीमती निलीम इनवाते, ब.नं २१८२, नेम. दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण यांनी महत्वपुर्ण योगदान दिले. कोर्ट कामात पैरवी पोहवा इमरान शेख, ब. नं. १९९० पोलीस स्टेशन देवलापार यांनी मदत केली आहे.

## विनयभंग करणाऱ्या आरोपीला मा. न्यायालयाने सुनावली शिक्षा

**पोलीस स्टेशन वेलतुर** :— फिर्यादी/ पिडीत हीच्या तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वेलतुर येथे १८०/२०२४ कलम ७४,७५(२),३३३ भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंद झालेला होता. सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, दिनांक १६/१०/२०२४ रोजी सकाळी १०.०० वा. सुमारास फिर्यादी ही तिचे घरी एकटीच हजर असताना आरोपी **गुड्डु उर्फ राकेश भोतमांगे, वय २९ वर्षे, रा. पोहरा, पोस्ट. टेकेपार,ता कुही जि नागपुर** हा तिचे घरात आला. घरात कोणीच नसल्याचा फायदा घेवुन हॉलचा दरवाजा बंद करून फिर्यादीचा हात पकडून तीचा विनयभंग केला, अशा फिर्यादिच्या रिपोर्टवरून सदरचा गुन्हा नोंद

पोलीस उपनिरीक्षक पल्लवी कळमकर, नेम पोलीस स्टेशन वेलतुर यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. **दिनांक १७/०८/२०२६ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायधीश क्रं ६ ए.ए. जोगळेकर यांनी नमुद आरोपी गुड्डु उर्फ राकेश भोतमांगे, वय २९ वर्षे, रा. पोहरा, पोस्ट. टेकेपार,ता कुही जि नागपुर याला १) कलम ७४ भान्यासं मध्ये १ वर्षे सश्रम कारावास व १०००/— रू. दंड, दंड न भरल्यास १ महीना साधा कारावास, २) कलम ७५(२) भान्यासं मध्ये ३ वर्षे सश्रम कारावास व २०००/— रू. दंड, दंड न भरल्यास ३ महिने साधा कारावास,३) ३३३ भान्यासं मध्ये ४ वर्षे सश्रम कारावास व २,०००/— रू. दंड, दंड न भरल्यास ३ महिने साधा कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.**

सरकारचे वतीने सरकारी अभियोक्ता श्रीमती वेदीका पाटील आणि श्री एल.बी शेंद्रे यांनी काम पाहीले. सदर खटल्याच्या सुनावली दरम्यान श्री मयंक माधव, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग, पोलीस निरीक्षक श्री प्रशांत

काळे, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन वेलतुर , पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी, दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण, सपोनि श्री विशांत नांदगाये, पोहवा श्री रामदास कोराम, ब.नं २२४ , नेम. दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण यांनी महत्वपुर्ण योगदान दिले. कोर्ट कामात पैरवी सफौ, संतोष गुंटीवार ब. नं. २२६ पोलीस स्टेशन कुही यांनी मदत केली आहे.

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## १४ जनावरांची सुटका, कन्हान पोलसांची कामगिरी
## ३ वाहनांसह १८ लाख ६० हजारांचा मुद्देमाल जप्त

पोलीस स्टेशन कन्हान :— **दि. १७/०८/२०२६ रोजीचे कन्हान पोलीस हद्दित पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारा कडुन माहिति मिळाली की, अवैद्यरित्या म्हशींची कत्तली करीता वाहतुक होत आहे. अशी माहीती प्राप्त होताच कन्हान पोलीसांनी राष्ट्रीय महामार्ग ४४ रोडवर नाकाबंदी केली. नाकाबंदी दरम्यान प्राथमिक आरोग्य केंद्र कन्हान समोर ३ बोलेरो पिकअप वाहने मिळुन आले.** १) बोलेरो पिकअप गाडी क्र. एम. पि. २८ झेड. आर. ५२३४ चा चालकाने त्याचे नाव **आकाश श्रीराम इनवाती वय २४ वर्ष रा. जमुनिया कला, ता. बिचवा जि. छिंदवाडा,** २) बोलेरो पिकअप गाडी क्र. एम. पि. २८ झेड. आर. ५३६१ चा चालकाने त्याचे नाव **राजेश प्रताप कुलतिया वय ३३ वर्ष रा. उलावाडी त. बिछवा जि. छिंदवाडा,** व ३) बोलेरो पिकअप गाडी क्र. एम. पि. १५ जि. ४१४५ चा चालकाने त्याचे नाव **मन्सुर खान मकबुल खान वय २७ वर्ष रा. बरघाट त. बरघाट जि. शिवणी** असे असल्याची माहीती प्राप्त झाली.

**पंचासमक्ष तिन्ही वाहनाची पाहणी केली असता वाहनाचे मागील डाल्यात म्हैस व हेले ही जनावरे अत्यंत निर्दयतेने कोंबुन आखुड दोरखंडाने बांधुन जनावरांची चारापाण्याची व्यवस्था न करता कत्तलीकरीता वाहतुक करतांना मिळुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद तिन्ही वाहने आणि वाहनातील १४ जनावरे किंमती असा एकुण किंमती १८,६०,००० /— रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपी यांचे विरुद्ध ५(अ)(१)(२) महा. प्राणी संरक्षण अधी, सहकलम ११(१) (ड), ११(१) (इ), ११(१) (एफ)**

**प्राणी छळ प्रतिबंधक अधि,सहकलम ८३,१७७ मो वा का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**



## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद ०४ जनावरांची सुटका, वडोदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन वडोदा** :— दिनांक १६/०८/२०२६ रोजी वडोदा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या जनावरांची कत्तलीकरीता वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी पोलीस स्टेशन वडोदा हद्‌दीतील भंडाराकडुन नागपूरकडे जाणाऱ्या वडोदा पुलावरती नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान पोलीसांना एक संशयित झेनॉन योद्धा वाहन क्र. एम एच—४९/ए टी —६६१४ येताना दिसले. पोलीसांनी वाहन थांबवून तपासणी केली असता **१) चालक नामे योगेश मधुकर फुंदे, वय २९ वर्ष, रा. तुकडोजी चौक आमगाव जि. गोंदीया व वाहक नामे**

**२) नवशाद अली इब्राहीम अली सय्यद, वय ३२ वर्ष, रा. वार्ड नं. १०, लाखनी, जि. भंडारा** हे मिळुन आले. मालकाबाबत विचारपुस केली असता **राजा कुरेशी, रा. लाखनी भंडारा** अशी माहिती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष सदर वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ०४ हले जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले.

पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून टाटा झेनॉन योद्धा वाहन क्र. एम एच—४९/ए टी —६६१४ किंमती ५,००,०००/— रूपये आणि ०४ हेले जनावरे किंमती १,६०,०००/— रूपये असा एकुण किंमती ६,६०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला. नमुद प्रकरणी आरोपी यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन वडोदा येथे  कलम ५(१) अ , ९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम कलम ११(१), (घ), (ड), (च), प्राण्यांचा छळ अधिनियम १९६० अन्वये गुन्हा नोंद केला आहे.



# काटोल पोलिसांच्या तत्परतेमुळे ८२ वर्षीय वृद्ध महीलेला मिळाले कुटुंब

पोलीस स्टेशन काटोल :— दिनांक १६/०८/२०२६ रोजी रात्री सुमारे ११:०० वाजता काटोल पोलीस स्टेशन हद्दीत एक अनोळखी वृद्ध महिला आढळून आली. पोलिसांनी तिची विचारपूस केली असता तिने आपले नाव विमलबाई नत्थु लांजेवार, वय ८२ वर्षे असे सांगितले. मात्र, तिला आपल्या गावाचे नाव सांगता येत नसल्याने तिच्या नातेवाईकांचा शोध घेणे काटोल पोलीसांसमोर आव्हान होते. पोलीस निरीक्षक श्री रणजित शिरसाठ, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन काटोल यांच्या नेतृत्वात काटोल पोलीसांनी विमलबाई नातेवाईकांचा शोध सुरू केला.

सदर वृद्ध महिलेच्या सुरक्षिततेचा विचार करून काटोल पोलिसांनी त्यांना मानव विकास बहुउद्देशीय संस्था, खापा घोडन, ता. नरखेड येथे सुरक्षितरीत्या दाखल केले. त्यानंतर तिच्या नातेवाईकांचा शोध घेण्यासाठी काटोल पोलीस स्टेशनच्या वतीने महिलेचे छायाचित्र व उपलब्ध माहिती असलेले आवाहनाचे बॅनर तयार करून सोशल मीडियावर प्रसारित करण्यात आले.या आवाहनाला नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला. सोशल मीडियावर प्रसारित करण्यात आलेल्या माहितीच्या आधारे विमलबाई लांजेवार यांच्या नातेवाईकांचा शोध लागला. त्यानंतर आज दि. १७/०८/२०२६ रोजी विमलबाई यांना त्यांचा मुलगा हेमराज विश्वकर्मा लांजेवार, रा. शेलगाव, ता. जि. बैतूल, मध्य प्रदेश यांच्या ताब्यात सुखरूप देण्यात आले.

काटोल पोलिसांच्या तत्पर कार्यवाही पोलीस आणि नागरिकांच्या समन्वयातून ८२ वर्षीय वृद्ध महिलेला तिच्या कुटुंबीयांपर्यंत सुखरूप पोहोचविणे शक्य झाले.



# नरखेड पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध दारू व्यवसायातील ०६ सराईत गुन्हेगारांना नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

पोलीस स्टेशन नरखेड हदद्दीतील सराईत आरोपी **१) नामे ज्योती योगेश मोहोड, वय २९ वर्ष, रा. खेडी कर्यात २) प्रमोद मनिकराव टेकाम, वय २९ वर्ष, रा. सारडी ३) मुकेश राजाराम कुंबरे, वय ३२ वर्षे, राहणार चोरखैरी ४) रोशन चंद्रभान गजभिये, वय ३२ वर्ष, राहणार सिद्धार्थ वार्ड, नरखेड ५) संतोष नंदलाल समुद्रे, राहणार सिद्धार्थ वार्ड नरखेड ६) चंद्रशेखर रामचंद्र खोब्रागडे, वय २५ वर्षे, राहणार मोहदी दळवी** यांना महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये हद्दपार करण्यात आले आहे.

**वर नमुद सराईत गुन्हेगार क्र १) ते ०६) यांचेवर अवैध दारू विक्री बाबत गुन्हे नोंद आहे.** नमुद आरोपींचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्यांचे वर कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी यांनी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपींच्या गुन्हेगारी कृत्यामुळे परीसरातील अनेकांना दारूचे व्यसन जडले आहे. तसेच त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे नमुद सहा आरोपींचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव नरखेड पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल यांच्या मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, काटोल यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर नमुद आरोपी क्रं १) हिला **१ महीन्यांकरीता आरोपी तसेच २) ते ६) यांना २ महीन्यांकरीता नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले आहे.**

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी हे नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.**



प्रमोद मनिकराव टेकाम



मुकेश राजाराम कुंबरे



रोशन चंद्रभान गजभिये,



संतोष नंदलाल समुद्रे



चंद्रशेखर रामचंद्र खोब्रागडे

## कुही पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध दारू व्यवसायातील ०३ सराईत गुन्हेगारांना नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

पोलीस स्टेशन कुही हद्‌दीतील सराईत आरोपी **१) सुनिल जालंधर परतेकी, वय ४० वर्ष, रा. उंद्री, ता. उमरेड, जि. नागपूर २) असिन अब्बास खान, वय ३४ वर्ष, रा. लातेहार झारखंड, ह.मु. प्लॉट नं. ८०, गरीब नवाज चौक, नवीन खरबी नागपूर ३) राहुल अशोक वासनिक, वय ३७ वर्ष, रा. मांढळ, ता. कुही, जि. नागपूर** यांना महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये हद्‌दपार करण्यात आले आहे.

**वर नमुद सराईत गुन्हेगार क्र १) याचेवर अवैध दारू विक्री बाबत गुन्हे नोंद आहे. तसेच सराईत गुन्हेगार क्र २) याचेवर रेतीचा गौण खनिज चोरी वाहतूक बाबत गुन्हे नोंद आहेत. सराईत गुन्हेगार क्र. ३) याचेवर अवैध दारू विक्री व जुगार बाबत गुन्हे नोंद आहेत.**

नमुद आरोपींचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्यांचे वर कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी यांनी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपींच्या गुन्हेगारी कृत्यामुळे परीसरातील अनेकांना दारूचे व्यसन जडले आहे. तसेच त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे नमुद आरोपींचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव कुही पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड यांच्या मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, उमरेड यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर नमुद आरोपी १) **सुनिल जालंधर परतेकी** यास **२ महीन्यांकरीता** तसेच **२) असिन अब्बास खान** याला **६ महीन्यांकरीता व ३) राहुल अशोक वासनिक** याला **३ महीन्यांकरीता** नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले आहे.

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी हे नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.**

२



सुनिल जालंधर परतेकी



असिन अब्बास खान



राहुल अशोक वासनिक

# नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार चालवणाऱ्यावर ०४ गुन्हे नोंद.

दिनांक १६/०८/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन यांनी अवैधरित्या ५२ ताशपत्ते जुगार खेळणाऱ्या/खेळविणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन ५२ ताशपत्ते व रोख रक्कम असा एकुण १५३०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण ०४ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे १) सदु गुलाबराव हीवशे, वय ५३ वर्ष, रा. एच पी गॅस गोडाउन जवळ काटोल, जि. नागपूर २) रविंद्र देवमन सोमकुवर, वय ५० वर्ष, रा. एच.पी.गॅस गोडाउन जवळ काटोल, जि.नागपुर ३) गोपाल बापूरावजी कूमरे, वय ५२ वर्ष, रा. काळे चौक काटोल जि. नागपूर ४) रामकृष्ण रामाजी परतेती, वय ४८ वर्ष, रा. गॅस गोडाउन झोपडपट्टी काटोल, जि. नागपुर ५) श्रावण माधवजी उईके, वय ६६ वर्ष, रा. गॅस गोडाउन झोपडपट्टी काटोल, जि. नागपुर ६) सुनिल हरीभाउ सांभारे, वय ४८ वर्ष, रा. गॅस गोडाउन झोपडपट्टी काटोल, जि. नागपुर हे अवैधरीत्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळताना मिळुन आले. **पोलीस स्टेशन बोरी** येथे आरोपी नामे १) अंकेश भुवनलाल हरिणखेडे, वय २७ वर्षे, रा. वार्ड क्र. ०२, जुनीवस्ती बुटीबोरी २) संदेश किशोर पंचभाई, वय २१ वर्ष, रा. वार्ड क्र ०६, जुनीवस्ती बुटीबोरी ३) मोहित रविंद्र निर्मेळे, वय २२ वर्ष, रा. वार्ड क्र. ०५, नवीन वस्ती बुटीबोरी ४) साहिल विजयराव घासले, वय २२ वर्ष, रा. वार्ड क्र. ०४, जुनीवस्ती बुट्टीबोरी ५) रितेश प्रभू पंधराम, वय २३ वर्ष, रा. प्रभाग क्र. ०२, बुट्टीबोरी हे अवैधरीत्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळताना मिळुन आले.

# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०७ गुन्हे नोंद

दिनांक १६/०८/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण ६२००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०७ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे शंकर छगनलाल जथरे, वय ३५ वर्षे, रा. पिलापुर, ता. नरखेड याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बोरी येथे** आरोपी नामे राजू मोतीराम झाकणकर, वय ४० वर्ष, रा. रूईखैरी, ता. जि. नागपूर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन अरोली** येथे आरोपी नामे कमलेश कपुरचंद भगत, वय ३४ वर्ष, रा. दुधाळा, ता. मौदा, जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन देवलापार येथे** आरोपी नामे जय नारायण धुर्वे, वय ५२ वर्ष, रा. देवलापार, ता. रामटेक, जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन पाचगाव येथे** आरोपी नामे सुनिल पंढरी वंजारी, वय ५३ वर्ष, रा. धामणा, ता. जि. नागपूर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कन्हान येथे** आरोपी जितेन्द्र सुरेश घोगरे, वय ४१ वर्ष, रा. जुनी कामठी ता. पारशिवनी याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन** वडोदा येथे महिला आरोपी हिचेवर १ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण ९००० मिली देशी दारू, २२ लिटर मोहाफुल दारू असा एकुण ६२००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने